# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## जाहीर प्रकटन

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हे देशातील नामांकित विद्यापीठ असून देशातील तसेच आंतरराष्ट्रीय विद्यार्थी विद्यापीठामध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी प्रवेशीत झालेले आहेत. अर्थातच या विद्यार्थ्यांना शिक्षणास पूरक सौहार्दपूर्ण व शांततामय वातावरणाची आवश्यकता असते. गेल्या काही काळात घडणाऱ्या घटनांमुळे विद्यापीठाच्या शैक्षणिक कार्यामध्ये व्यत्यय निर्माण होऊन त्याचे पर्यावसण वादामध्ये झाल्याचे निदर्शनास आले आहे. यासंदर्भात पोलिसात देखील तक्रारी दाखल झाल्याने विद्यापीठ प्रशासन व पोलिस प्रशासन चिंतित आहे.

विद्यापीठ आवारात शैक्षणिक पावित्र्य राखणे व वैचारिक स्वातंत्र्यासोबत सलोख्याचे वातावरण जपणे ही समाजाच्या सर्व घटकांची सामुदायिक जबाबदारी आहे. या अनुषंगाने विद्यापीठाशी संबंधित सर्व विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी यांच्या संघटनासोबत चर्चा करून सर्वंकष उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.

सबब, सदर प्रकटनाद्वारे उपरोक्त सर्व संघटनांना कळविण्यात येते की मा. कुलगुरू व मा. पोलिस आयुक्त, पुणे शहर यांचे सन्माननीय उपस्थितीत शनिवार दि. १८ नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी ११:०० वाजता विद्यापीठ मुख्य इमारतीमधील ज्ञानेश्वर सभागृहात आपल्या अध्यक्ष/ प्रतिनिधी सोबत बैठक आयोजित करण्यात येत आहे. तरी आपापल्या संघटनेच्या कमाल ३ ते ५ प्रतिनिधींना सदर बैठकीस उपस्थित राहण्याबाबत सूचित करावे.

डॉ. पराग काळकर
प्र- कुलगुरू

जा . क्र . एएन / ३७८५
दिनांक . १३ / ११ /२०२३